# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## कृषि संशोधन केंद्र, अंजनगाव रोड, अचलपुर

**दुरध्वनी**[कार्यालय]-०७२२३/२२०११
**ईमेल**:arsachalpur@pdkv.ac.in
arsachalpur@gmail.com


---

जा.क. कृसंके/अचल./उद्यानविद्या/१२६/२०२६
कृषि संशोधन केंद्र, अचलपूर
सहयोगी प्राध्यापक (कृषिविद्या) यांचे कार्यालय
दिनांक- १८/०६ /२०२६

## दरपत्रक/निविदा

प्रति,

..............................................

**विषय— रोपवाटीकेतील कामे बाह्यस्त्रोतातून करार पध्दतीने करणे बाबत.**

वरील विषयाच्या अनुषंगाने कृपया सोबत दिलेल्या अटी व शर्तीच्या आधीन राहून रापेवाटीकेतील कामे बाह्यस्त्रोतातून करार पध्दतीने करणे बाबत दरपत्रके खालील प्रमाणे या कार्यालयात विहित मुदतीत सादर करावेत.

| अ.क्र. | कामाचे विवरण | प्रमाण | द्यावयाचे दर (रुपयात) |
|---|---|---|---|
| १ | अलिमो/जंबेरी/रंगपूर रोपे जमिनीतून/क्रेटस मधून उपटून पॉलीथीन पिशवीमध्ये स्थलांतर करणे | प्रति रोप/प्रति पिशवी | |
| २ | शेणखत, माती व रेतीचे मिश्रण करुन पॉलीथीन पिशव्या भरणे (१२X ८ इंच) | प्रति पिशवी | |

**दर पत्रकाविषयी नियम व अटी व शर्ती**

१. दर पत्रके मोहरबंद लिफाफ्या मध्ये दिनांक २९ जून, २०२६ पर्यत सादर करावीत.
२. लिफाफ्याच्या डाव्या बाजुस स्पष्ट अक्षरात **'रोपवाटीकेतील कामाबाबत'** असे नमुद करावे तसेच दर पत्रकामध्ये या कार्यालयाचा संदर्भ पत्र क. रोपवाटिका/१२६/२०२६ व दि. १८/०६/२०२६ नमुद करावे.
३. देयक सादर करतांना जी.एस.टी. संबंधी शासन निर्णय जुलै २०१७ मधील नियम व अटी व शर्ती ची पूर्तता करण्याची जबाबदारी हि ठेकेदारांची स्वत:ची असेल.
४. काम करणाऱ्या मजुरांच्या कायदेशिर दायीत्वाची ई. ची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची असेल व कुठल्याही प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती अथवा शारीरिक हानी उदा. वीज पडणे, साप चावणे, झाडावरुन पडणे व शेतीस अनुसरुन ईतर ईजा ई. बाबत हे कार्यालय कुठल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही/स्वीकारणार नाही.
५. काम अपूर्ण अवस्थेत सोडून दिल्यास कामाचा मोबदला दिल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.
६. समान दरपत्रके व दर आढळून आल्यास या पूर्वी केलेल्या काम आणि अनुभव यांना प्राधान्य देण्यात येईल. व याबाबतचे सर्व अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता यांचे असतील.
७. कोणतीही निविदा पूर्ण पणे अंशत: स्वीकारणे किंवा आलेल्या सर्व दरपत्रके नाकारणे यांचे अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता तसेच गठीत समितीचे यांचे असतील.
८. संबंधित ठेकेदारांने कामाचे दर हे किती दिवसां करिता वैध आहेत हे दर पत्रकात स्पष्ट नमुद करावे अन्यथा सदरचे दर हे १८० दिवसां करिता पुढील आर्थिक वर्षात सुध्दा ग्राहय धरण्यात येतील.

९. काही तांत्रिक अथवा कार्यालयीन कारणास्तव देयके अदा करण्यास उशीर झाल्यास संबंधित ठेकेदारास मजुरांचे देयक अदा करण्याची स्वत: जबाबदारी राहील. तसेच काम करणा–याच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर राहणार नाही. त्याबाबत कोणत्याही प्रकारचे दैस्ताऐवज या कार्यालयामार्फत मिळणार नाही.

१०. यशस्वी झालेल्या कलम मोजुन देण्याची जबाबदारी हि ठेकेदारांची असेल.

११. दर पत्रके मंजुर करणे अथवा काम समाधानकारक न केल्यास सदर करार रद्द करणे या बाबतचे सर्व हक्क समितीने स्वत:कडे राखून ठेवले आहेत.

१२. या प्रक्षेत्रावरील कलमे व इतर उत्पादने कोणत्याही सबबीवर बाहेर नेता येणार नाहीत.

१३. या दरप्रक्रिये अथवा कामाच्या बाबतीत काही न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास अचलपूर न्यायालयात चालेल.

१४. संबंधित ठेकेदारांनी वरील नियम व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र सही, नाव व पूर्ण पत्त्यासह व मोबाईल क्र. सह दर पत्रक सोबत सादर करावेत.

**प्रभारी अधिकारी**
**कृषि संशोधन केंद्र, अचलपूर**

**प्रतिलीपी–**

१. मा. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहिती तथा उपरोक्त दरपत्रक/निविदा जाहिरातीचे प्रारुप विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे हि विनंती.

२. कार्यालयीन नोटीस बोर्डावर